# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे **{नगर रचना आणि मुल्य. वि.}** कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मूळ हद्दीची विकास योजना (दुसरी सुधारित) व वाढीव हद्दीची नव्याने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.

नागपूर शहराची विकास योजना दि. ०३/०६/१९७६ रोजी मंजूर झाली असून दि. ३०/०७/१९७६ रोजी अंमलात आली. तद्नंतर नागपूर शहराची प्रथम सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ)- ९७- नवि-९ दि. ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजुर झाली असुन दि. ०१ मार्च २००० पासुन अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४०० १६२८-सी. आर. २००-२०००- नवि-९, दि. १०/०९/२००१ अन्वये मंजूर झाली असुन दि. २९/०९/२००१ पासुन अंमलात आलेली आहे.

शासन अधिसुचना क्र. नामपा- २०१२/ प्र. क्र. /नवि- २६ दि. १४/०५/२०१३ च्या अधिसूचनेनुसार मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा ही महसुली गावे नागपूर प्रादेशिक योजनेतून वगळून नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र. १५४-२०१९ नवि-९, दि. २७ ऑगस्ट २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तद्नंतर नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र.-१५४ (भाग-१)/२०१९/नवि-९ दि. ०९.०४.२०२१ अन्वये नागपूर शहरातील नागपूर सुधार प्रन्यासची ७ योजना वगळून स्मार्ट सिटी अंतर्गतचे मौजा पारडी, भरतवाडा, पुनापूर व भांडेवाडी चे क्षेत्र आणि उर्वरित संपूर्ण क्षेत्राकरिता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

शासनाचे पत्र. क्र .टिपीएस – २४१९ /१४१९/प्र.क्र.१५/२०२५/नवि-९, दि.२९/४/२०२५ अन्वये *"व्यापक जनहितार्थ, एकात्मिक नियोजनासाठी व नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागपूर सुधार प्रन्यास अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सात योजना समाविष्ट करून एकत्रितरीत्या नागपूर शहराची दुसरी सुधारित विकास योजना करण्याची कार्यवाही करणेबाबत नागपूर महानगरपालिकेला निर्देशित केले आहेत."* त्यानुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम ३८व २३ (१)अन्वये नागपूर शहराची मुळ हद्द व वाढीव हद्दीची अंतिम विकास योजना तयार करण्याचे अधिकार नागपूर महानगरपालिकेला प्रदान करण्यात आलेले आहेत .

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ व कलम २१ (२) अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी विकास योजना (दु.सु.) तयार करणे आवश्यक आहे. सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) चे अनुषंगाने कलम २३(१) अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्राकरीता

विकास योजना (दु.सु.) तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (२) नुसार नागपूर महानगरपालिका हद्दीत तसेच प्रारूप विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व मा. आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका नागपूर यांनी साक्षांकित केलेला नकाशा आयुक्त,नागपूर महानगरपालिका कार्यालयासह उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका कार्यालयात व नागपूर सुधार प्रान्यास कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात यावा. विकास योजना तयार करण्याचा नागपूर महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात यावा. सदरची सूचना, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ६० दिवसांचे कालावधीत प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या सूचना/हरकतींचा विचार प्रारूप विकास योजना तयार करताना करण्यात यावा. तसेच विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करून उक्त क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून नागपूर महानगरपालिका, नागपूर कडे सादर करण्याकरिता, त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका नागपूर यांची **'नगर रचना अधिकारी'** म्हणून नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. नगर रचना अधिकारी यांच्या नेमणूकीस मा. सहसंचालक, नगर रचना विभाग यांची पूर्व मंजुरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्यांनी मंजुरी दिल्यानंतर नगर रचना अधिकारी यांच्या नियुक्तीचे औपचारिक आदेश. मा. आयुक्त यांनी पारीत करावे. विकास योजना तयार करण्याच्या कायदेशीर बाबींवर कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना देण्यात येत असून तद्संबंधी लागणाऱ्या सर्व खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 11**/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 14/05/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) नुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील मूळ हद्दीची विकास योजना (दुसरी सुधारित) व वाढीव हद्दीची नव्याने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.

नागपूर शहराची विकास योजना दि. ०३/०६/१९७६ रोजी मंजूर झाली असून दि. ३०/०७/१९७६ रोजी अंमलात आली. तद्नंतर नागपूर शहराची प्रथम सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये शासन

अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३०० (अ)- ९७- नवि-९ दि. ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजुर झाली असुन दि. ०१ मार्च २००० पासुन अंमलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४०० १६२८-सी. आर. २००-२०००- नवि-९, दि. १०/०९/२००१ अन्वये मंजूर झाली असुन दि. २९/०९/२००१ पासुन अंमलात आलेली आहे.

शासन अधिसुचना क्र. नामपा- २०१२/ प्र. क्र. /नवि- २६ दि. १४/०५/२०१३ च्या अधिसूचनेनुसार मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा नरसाळा ही महसुली गावे नागपूर प्रादेशिक योजनेतून वगळून नागपूर महानगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र. १५४-२०१९ नवि-९, दि. २७ ऑगस्ट २०१९ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. तद्नंतर नगर विकास विभागाची अधिसुचना टिपीएस-२४१९-१४९९-प्र.क्र.-१५४ (भाग-१)/२०१९/नवि-९ दि. ०९.०४.२०२१ अन्वये नागपूर शहरातील नागपूर सुधार प्रन्यासची ७ योजना वगळून स्मार्ट सिटी अंतर्गतचे मौजा पारडी, भरतवाडा, पुनापूर व भांडेवाडी चे क्षेत्र आणि उर्वरित संपूर्ण क्षेत्राकरिता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे.

शासनाचे पत्र. क्र .टिपीएस – २४१९ /१४१९/प्र.क्र.१५/२०२५/नवि-९, दि.२९/४/२०२५ अन्वये *"व्यापक जनहितार्थ, एकात्मिक नियोजनासाठी व नियोजनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नागपूर सुधार प्रन्यास अधिकारक्षेत्रात येणाऱ्या सात योजना समाविष्ट करून एकत्रितरीत्या नागपूर शहराची दुसरी सुधारित विकास योजना करण्याची कार्यवाही करणेबाबत नागपूर महानगरपालिकेला निर्देशित केले आहेत."* त्यानुषंगाने उक्त अधिनियमाच्या कलम ३८व २३ (१)अन्वये नागपूर शहराची मुळ हद्द व वाढीव हद्दीची अंतिम विकास योजना तयार करण्याचे अधिकार नागपूर महानगरपालिकेला प्रदान करण्यात आलेले आहेत .

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३८ व कलम २१ (२) अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी विकास योजना (दु.सु.) तयार करणे आवश्यक आहे. सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) चे अनुषंगाने कलम २३(१) अन्वये नागपूर महानगरपालिका क्षेत्राकरीता विकास योजना (दु.सु.) तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (२) नुसार नागपूर महानगरपालिका हद्दीत तसेच प्रारूप विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व मा. आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका नागपूर यांनी साक्षांकित केलेला नकाशा आयुक्त,नागपूर महानगरपालिका कार्यालयासह उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर महानगरपालिका कार्यालयात व नागपूर सुधार प्रान्यास कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात यावा. विकास योजना तयार करण्याचा नागपूर महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सूचनेव्दारे प्रसिध्द करण्यात यावा. सदरची सूचना, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ६० दिवसांचे कालावधीत प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या सूचना/हरकतींचा विचार प्रारूप

विकास योजना तयार करताना करण्यात यावा. तसेच विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करून उक्त क्षेत्राचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून नागपूर महानगरपालिका, नागपूर कडे सादर करण्याकरिता, त्या क्षेत्राचे विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये उपसंचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, महानगरपालिका नागपूर यांची **'नगर रचना अधिकारी'** म्हणून नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. नगर रचना अधिकारी यांच्या नेमणूकीस मा. सहसंचालक, नगर रचना विभाग यांची पूर्व मंजुरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व त्यांनी मंजुरी दिल्यानंतर नगर रचना अधिकारी यांच्या नियुक्तीचे औपचारिक आदेश. मा. आयुक्त यांनी पारीत करावे. विकास योजना तयार करण्याच्या कायदेशीर बाबींवर कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर यांना देण्यात येत असून तद्संबंधी लागणाऱ्या सर्व खर्चास मंजूरी देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**